(ESTD. 1965)
Gondia Education Society's
SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &
SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE
Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara
Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301
Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 18.06.2023

# कला शाखा अभ्यास मंडळ अहवाल - सत्र : २०२२-२०२३

सत्र २०२२-२०२३ मध्ये कला शाखेच्या वतीने दिनांक १७/०८/२०२२ ला कला शाखा उद्घाटन व स्व. मनोहरभाई पटेल स्मृतिदिन निमित्त गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून तुमसर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (बी.डी.ओ.) श्री. उमेश नंदागवळी उपस्थित होते. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कला शाखेचे प्रभारी डॉ. जयंतकुमार मस्के यांनी केले. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. रेणुकादास उबाळे व आभार प्रदर्शन डॉ. राजेंद्र बेलोकार यांनी केले.

सत्र २०२२-२०२३ या सत्रात कला शाखा अभ्यास मंडळाच्या वतीने घेण्यात आलेले कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत.

इंग्रजी विभागाच्या वतीने या सत्रात ‘Forum for Efficiency in the English Language and Literature (FEELL)- Workshop on LSRW Skill, Unwilling the Wallpaper Ceremony, The Guest Lecture on Errors in English Grammar Usages, A Guest Lecture on Communication English & A Lecture on Grammatical Usage, Celebration of International Girls Child Day, show on the topic - Develop Effective English Speaking, A State Level Conference on Gender Sensitization इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मराठी विभागाच्या वतीने दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी ‘मराठी भाषा गौरव दिवस’ साजरा करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम तसेच मराठी विभागप्रमुख डॉ. रेणुकादास उबाळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मराठी, हिंदी व इंग्रजी विभागाच्या वतीने दिनांक १७ एप्रिल २०२३ रोजी ‘लिंगभाव संवेदनशीलता’ या राज्यस्तरीय एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. संजय बोरुडे (लेखक व समीक्षक, अहमदनगर) व श्री. श्रीकांत ढेरंगे (प्रसिद्ध कवी व लेखक, संगमनेर) हे उपस्थित होते.

हिंदी विभागातर्फे १४ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रभाषा हिंदी दिवसानिमित्त ‘राष्ट्रीय एकात्मता में हिंदी भाषा का योगदान’ या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण १७ विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम होते. या स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार रूपात स्पर्धा परीक्षेचे पुस्तके देण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व हिंदी विभागप्रमुख यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 18.06.2023

सत्र २०२२-२०२३ मध्ये अर्थशास्त्र विभागातर्फे अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची विद्यार्थी समिती गठीत करण्यात आली. विद्यापीठ पाठ्यक्रमासंबंधी विद्यार्थ्यांमध्ये योग्य आकलन व आवड निर्माण व्हावी या हेतूने शिकविलेल्या घटकावर चर्चासत्राचे आयोजन दिनांक २३ नोव्हेंबर२०२३ रोजी करण्यात आले. नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यापीठाचे बदललेले अभ्यासक्रम व परीक्षेचे स्वरूप याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी 'Tips for University Examination Preparation' या कार्यक्रमाचे ०५ एप्रिल २०२३ ला आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये डॉ. जयंतकुमार मस्के, डॉ. गोल्डीबघमार, डॉ. राजेंद्र बेलोकर प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. अरुण चव्हाण यांनी केले. तसेच पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाअंतर्गत तुमसर परिसरातील २८ लघु व कुटीर उद्योगांचे आर्थिक सर्वेक्षण घेण्यात आले. यामध्ये २८ विद्यार्थी सहभागी होते आणि पदवी अर्थशास्त्र विभागाअंतर्गत हसारा या गावात ४५ कुटुंबाचे आर्थिक सर्वेक्षण घेण्यात आले.यामध्ये २७ विद्यार्थी सहभागी होते.

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक १४.०८.२०२२ रोजी 'विभाजन विभीषिका स्मृती दिवस १४ अगस्त' कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार बी. मसराम होते. दिनांक २६.११.२०२२ रोजी संविधान दिवस कार्यक्रम साजरा करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालायाचे ग्रंथपाल प्रा. सुनील कान्होलकर होते. दिनांक २१ जानेवारी२०२३ रोजी 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी मतदार जागरुकतेसाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मतदानासाठी प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच २५ जानेवारी २०२३ ला निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये ५३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच पदवी व पदव्युत्तर विभागाद्वारे दिनांक २६ जानेवारी २०२३ ते १० फेब्रुवारी २०२३ या कालावधीत लोकशाही पंधरवाडा निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ ला ग्राम कोष्टी येथे विद्यार्थ्यांकडून मतदार जागरूकता लोकशाही संबंधी जनजागृती फलक व घोषणासह प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच दिनांक ०७ फेब्रुवारी २०२३ रोजी 'लोकशाही, निवडणूक व सुशासन' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले. याप्रसंगी डॉ.आर. जे. भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिनांक ०६ एप्रिल २०२३ रोजी 'स्वतंत्रता संग्राम में जनजाति नायकों का योगदान' या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. श्याम कोरेटी, इतिहास विभागप्रमुख रा. तु. म. नागपुर विद्यापीठ नागपूर व श्री. अनिल मरसकोल्हे हे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम उपस्थित होते.

सत्र २०२२-२०२३ मध्ये समाजशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने दिनांक१२ जुलै २०२२ मध्ये रा. तु. म. नागपूर विभागाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पर्यावरण, साहित्य, देशभक्ती, हुंडाबळी, शिक्षण इत्यादी विषयांवर जाणीव जागृती करणारे

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 18.06.2023

पोस्टर महाविद्यालयाच्या भिंतीवर कायमस्वरूपी लावण्यात आले. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम यांनी केले. एप्रिल २०२३ मध्ये समाजशास्त्र विभागाच्या तृतीय विद्यार्थ्यांची आदिवासी ग्राम सर्वेक्षण भेट आयोजित करण्यात आली होती. सावनेर तालुक्यातील कुँवारा भिवसेन या आदिवासी गावाला समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन गावातील लोकांचे जीवन जवळून जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच या आदिवासी गावांचे सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण करून गावांविषयीची संपूर्ण माहिती जाणून घेतली. यामध्ये तृतीय वर्षाच्या ३५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. मार्च २०२३ मध्ये समाजशास्त्र अभ्यास मंडळ व पर्यावरणशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १० मार्च २०२३ ला पर्यावरणीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर शैक्षणिक सहल घोगरा महादेव, तह. सावनेर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर सहलीमध्ये बी.ए. द्वितीय वर्षाचे १२० विद्यार्थी व कला शाखेचा संपूर्ण प्राध्यापक वर्ग सहभागी झाला होता.

भूगोल विभागाच्या वतीने दिनांक १६ सप्टेंबर २०२२ला 'आंतरराष्ट्रीय ओझोन दिन' या निमित्त पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जयंतकुमार मस्के उपस्थित होते. तसेच दिनांक २२ सप्टेंबर२०२२ ला 'जागतिक विषुव दिन' या निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून डॉ. सचिन वेरुळकर,डॉ. राधेश्याम दिपटे व डॉ. भारती काटेखाये यांनी या दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मसराम सर होते. भूगोल विभागाच्या वतीने नवरगाव या गावी दिनांक ०१ एप्रिल २०२३ रोजी 'सामाजिक-आर्थिक सर्वे' करण्यात आले. या सर्वेमध्ये ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तर दिनांक ११ मार्च २०२३ रोजी घोगरा महादेव व कुँवारा भिवसेनयेथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या ठिकाणाचे भौगोलिक व ऐतिहासिक माहिती देण्यात आली. या सहलीत १२० विद्यार्थी सहभागी होते.

गृहअर्थशास्त्र विभागाच्या वतीने १८ ऑक्टोबर २०२२ रोजी एस. एन. मोर कॉलेज, तुमसर, महिला महाविद्यालय, नंदनवन, नागपूर व वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बदललेला अभ्यासक्रम या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटक माननीय डॉ. संजय दुधे,प्रभारीकुलगुरू, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम, प्राचार्य वंदना भागडीकर, डॉ. साधना शिलेदार, डॉ. राजश्री वैष्णव व डॉ. भारती काटेखाये उपस्थित होते. तसेच विभागाच्या वतीने दिनांक २४ एप्रिल २०२३ रोजी विद्यार्थिनीचे हिमोग्लोबिन, सिकलसेल, थायराइड तपासणी शिबीर घेण्यात आले.यावेळी सुभाषचंद्र बोस, शासकीय उपजिल्हा रुग्णालय, तुमसर येथील चमूने १२० विद्यार्थ्यांची तपासणी केली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम यांनी मार्गदर्शन केले. दिनांक ०१ एप्रिल २०२३ रोजी तुमसर तालुक्यातील

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 18.06.2023

हसारा, मुंढरी, बोरी, कोष्टी व चिचोली या भागातील ३० गर्भवती स्त्रियांच्या 'आहार व आरोग्याचा दर्जा' यावर सर्वेक्षण करण्यात आले. श्रीमती जी. बी. महिला महाविद्यालय यांच्यासोबत खाद्यपदार्थ कार्यक्रम व प्रदर्शन कार्यक्रम दिनांक १६ सप्टेंबर २०२२ ला घेण्यात आले.

एस. एन. मोर कला व वाणिज्य व श्रीमती जी. डी. सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर येथे इतिहास विभागाच्या वतीने दिनांक ०३ ऑक्टोबर २०२२ रोज सोमवारला 'राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती' साजरी करण्यात आली. या जयंती कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. रेणुकादास उबाळे सर (मराठी विभाग), प्रमुख पाहुणे प्रा. जनार्दन बी. मेश्राम तसेच प्रमुख वक्ता प्राध्यापिका सौ. रजनी वाघाये मॅडम तसेच डॉ. बेलोकार सर, प्रा. खांदवे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पेटकुले सर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार कु. स्वाती हिने पार पाडले.

दिनांक ३ मे २०२३ ला कला शाखेतील बी.ए. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून बी.ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम सर उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजी विभागाचे विभागप्रमुख डॉ. राधेश्याम दिपटे, ग्रंथपाल प्रा. सुनील कान्होलकर व कला शाखेचे प्रभारी डॉ. जयंतकुमार मस्के प्रामुख्याने उपस्थित होते. या कार्यक्रमाला कला शाखेचे सर्व प्राध्यापक व ३००पेक्षा अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

कला शाखा अभ्यास मंडळ
१) डॉ. राजेंद्र बेलोकार
२) प्रा. लक्ष्मण पेटकुले

कला शाखा प्रमुख
डॉ. जयंतकुमार मस्के








देशोन्नती

**स्व. मनोहरभाईंनी साधला जनसामान्यांचा उत्कर्ष : डॉ. मसराम**

एस.एन.मोर महाविद्यालयातील स्व.मनोहरभाई पटेल स्मृतीदिन कार्यक्रम

देशोन्नती वृत्तसंकलन...

**तुमसर** - स्व. मनोहरभाई पटेल यांनी गोंदिया शिक्षण संस्थेच्या स्थापनेतून जनसामान्यांचा सर्वांगीण उत्कर्ष साधला. पूर्व विदर्भातील भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील जनतेकरिता शिक्षणाचे दार खुले केले. परिणामी हा परिसर विकासाच्या मुख्य धारेत सहभागी होऊ शकला. याची कृतज्ञता सर्वांनी बाळगावी, असे प्रतिपादन एस.एन.मोर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चेतनकुमार मसराम यांनी केले.

गोंदिया शिक्षण संस्थेद्वारा संचलित एस.एन.मोर कला, वाणिज्य व श्रीमती जी.डी. सराफ विज्ञान महाविद्यालयातील कला शाखेच्या वतीने कला शाखा उद्घाटन व स्व. मनोहरभाई पटेल स्मृतीदिनानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अतिथी तुमसर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (बी.डी.ओ) उमेश नंदागवळी उपस्थित होते. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चेतनकुमार मसराम हे उपस्थित होते.

यावेळी उमेश नंदागवळी म्हणाले की, कला शाखा ही आदर्श मानवता मूल्य घडविणारी सर्वोत्तम विद्याशाखा आहे. कला शाखेतून समाजावर मल्ये, तत्वे व विवेकशीलतेचे संस्कार होतात. त्यामुळे या शाखेतील विद्यार्थ्यांनी नव्या जोमाने यश संपादन करावे. या कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांचे वाटप करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील कला शाखेचे प्रभारी डॉ.जयंतकुमार मस्के, डॉ.राहुल भगत, डॉ.संजय आगासे, डॉ.आर.के.दिपटे, डॉ.जी.जी.बघमार, डॉ.बी.डी.काटेखाये, प्रा.अमोल खांडवे, डॉ.आर.आर.दिपटे, डॉ.एस.एस.बेळकर, एस.बी.कान्होलकर, डॉ.ए.एस.बावनकर, प्रा.ए.बी.चव्हाण, डॉ.के.के.लेंडे, डॉ.एच.ए.कल्याणी, डॉ.संतोष चौधरी, प्रा.ज्ञानेश्वर जांभुळे, प्रा.कमलेश राऊत, प्रा.रचनी वाघाये इ.उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा.रेणुकादास उबाळे यांनी केले. डॉ.जयंतकुमार मस्के यांनी प्रास्ताविक केले तर डॉ.राजेंद्र बेलोकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)